# राशिभविष्य - ऑक्टोबर, २०१२

**दादा दामले** (dadadamle@gmail.com)

==========================================================

**(१) मेष -** या राशीच्या मंडळीना या महिन्याच्या काळात अपेक्षित कौटुंबिक सुखसमाधान लाभेल. स्वतंत्र व्यावसायिकांच्या व्यवसायात वाढ होण्याची शक्यता आहे. पण आर्थिक व्यवहार सावधानतेनेच करावे. नपेक्षा आर्थिक चिंता करावी लागेल. या राशीच्या शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळीना या महिन्याचा पूर्वार्धच अधिक अनुकुल व लाभदायक होईल. वाम-मार्ग धन सहज मिळणे शक्य असले तरी तो मोह टाळाच. होत्याचे नव्हते होण्यास वेळ लागणार नाही. महिन्याचा उत्तरार्ध कौटुंबिक अनारोग्य व मनस्ताप यांच्याशी मुकाबला करण्यातच व्यतीत होईलसे दिसते. या राशीच्या काही मंडळीना पोटविकारांचा किंवा मूळव्याधीचा तर काहीना मूत्राशयविकाराचा त्रास होणे संभवते. दांपत्यजीवनात दोघांच्याही अनारोग्यामुळे बाधा येणे संभवते. शारीरिक-मानसिक कष्ट, उष्णताविकारांचे आजार त्रस्त करतील. जपा. अपघात भय आहे. तसेच वीज, पाणी यांपासूनही धोका संभवतो. जपा. संपर्कात येणाऱ्या माणसांना नीट पारखू शकलात तरच फ़सवणूक होणे टळेल. या राशीच्या कलाक्षेत्रातील विद्यार्थ्यांना काळ अनुकुल व प्रगतिकारक होईल. या राशीच्या व्ययस्थानी हर्षलसारखा विक्षिप्त ग्रह असल्यामुळे जिभेवर ताबा ठेवून, मनावर संयम ठेवून, घडणारे विपरीत ते सहन करता आले तरच नुकसानकारक असे फ़ारसे घडणार नाही. श्रद्धा असेल तर श्रीगणेशाची उपासना अनुकुल होईल.

**(२) वृषभ -** या राशीच्या मंडळीना या महिन्याचा पूर्वार्ध आरोग्यविघातक असा असला तरी गुरु ग्रहाच्या अनुकुलतेने आरोग्य फ़ारसे बिघडणार नाही, असे वाटते. महिन्याच्या उत्तरार्धात सर्व प्रकारचे आरोग्य उत्तम राहील. शुक्रामुळे शेती व्यवसाय असणारांना काळ लाभदायक होईल. कौटुंबिक सुखसमाधान लाभेल. मित्रमंडळीचा सहवास सुखाचा होईल. पण बौद्धिक मतभेदांनी मैत्रीत बाधा येणार नाही याची काळजी घ्यावी लागेल. संततिसुख लाभेल. महिन्याच्या उत्तरार्धात रवि-शनि या राशीच्या षष्ठ स्थानी असल्याने नोकरी-व्यवसायात मनाविरुद्ध घटना घडण्याची दाट शक्यता आहे. भागीदारीत व्यापार-व्यवसाय असणारांनी संशयाने भागीदारीत बाधा निर्माण होणार नाही याची काळजी घ्यावी, कोर्टप्रकरणे असतील तर ती पुढे ढकलण्याचा प्रयत्न करावा. महिन्याचा अखेरचा सप्ताह सर्व प्रकारच्या कलाक्षेत्रातील मंडळीना अनुकुल व लाभदायक होईल. साहित्यिकांचे लेखन प्रकाशित होईल. बौद्धिक संशोधन क्षेत्रातील मंडळीना काळ प्रगतिकारक होईल. दाम्पत्यजीवनात मतभेद किंवा अनारोग्य यांमुळे मनस्ताप होणे संभवते. सर्वच बाबतीत अनिश्चितता दर्शविणारा असा या महिन्याचा काळ असेल. श्रद्धा असेल तर शिवोपासन अनुकुल होईल.

**(३) मिथुन -** या महिन्याच्या काळात या राशीच्या मंडळीना एकूण सर्व ग्रहमान फ़ारसे अनुकुल नाही, असेच म्हणावे लागेल. सध्या या राशीच्या मंडळींचा स्वभाव लहरी झाला असण्याची शक्यता जाणवते. तसे असेल तर प्रयत्नपूर्वक स्वभावावर नियंत्रण ठेवणे आवश्यक होईल. रवि-मंगळ आरोग्यविघातक असून उष्णतेचे विकार, रक्तविकार, अंगावर फ़ोड येणे, ताप येणे अशापैकी विकारांनी अनारोग्य होण्याची दाट शक्यता आहे. जपा. तसेच कौटुंबिक जीवनात व नोकरी-व्यवसायात विविध कारणांनी मनस्ताप सहन करावा लागेलसे दिसते. त्यामुळे हृदयविकार

असणारांनी मन शांत ठेवणे



जरूरीचे होईल. चोरीमुळे वा अन्य कारणाने आर्थिक हानी होणेही संभवते. जपा. केवळ शुक्र ग्रहाची अनुकुलता असल्यामुळे मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व होणारा मनस्ताप सुसह्य होईल. वैद्यकीय संशोधन व भौतिक शास्त्रातील संशोधन क्षेत्रात कार्यरत असणारांना काळ थोडा अनुकुल व प्रगतिकारक होईल. अध्यात्मात रस असणारांना उपासनेद्वारे सात्विक सुखशांती लाभू शकेल काहींना सूचक स्वप्ने पडतील. सामाजिक कार्याची आवड असणारांना काळ अनुकुल व प्रगतिकारक होईल. काहींना जवळच्या प्रवासाचे तर काहींना परदेशगमनाचे योग येतील. श्रद्धा असेल तर शिवोपासना अनुकुल होईल.

**(४) कर्क -** या राशीच्या मंडळीना आर्थिक दृष्ट्या व कौटुंबिक सुखाचे बाबतीत या महिन्याचा काळ खूपच अनुकुल होईल. पण सुखस्थानातील शनिमुळे विविध कारणांनी गृहसौख्य मिळणे कठिण होईलसे दिसते. महिन्याच्या उत्तरार्धात त्यात रवि ग्रहाची भर पडून वाद, गैरसमज, अनारोग्य अशापैकी कारणांनी गृहसौख्यात अधिकच बाधा येणे संभवते. जपा. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण मनस्ताप व दगदग करून घेऊ नये. मुलांपैकी कोणाचे आजारपण, कोणाची आचरणविषयक समस्या, कोणाचे अभ्यासाकडे दुर्लक्ष अशापैकी कारणांनी या राशीच्या मंडळीना अपेक्षित संततिसुख मिळण्याची शक्यता दिसत नाही. ज्यांचा परधर्मीयांशी व्यावसायिक संबंध आहे अशांना काळ लाभदायक होईल. जलभय असल्यामुळे नोकरी-व्यवसायामुळे ज्यांचा पाण्याशी संबंध आहे त्यांनी सतत सावधानतेने आचरण करावे. वैद्यकीय व्यवसाय, यांत्रिकतांत्रिक व्यवसाय, शास्त्रीय संशोधन व्यवसाय असणारांना काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. काहींना दूरच्या प्रवासाचे योग येतील, तर काहीना परदेशगमनाची संधी मिळेल. या राशीच्या विवाहेच्छू युवकयुवतीना विवाहयोग संभवतो. या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीस काळ अनुकुल होईल. पण मित्रांशी वितुष्ट येणार नाही याची काळजी घ्या.

**(५) सिंह -** या राशीच्या मंडळीना या महिन्याच्या काळात गृहसौख्याच्या दृष्टीने मंगळ व राहू पूर्णपणे प्रतिकुल असणार आहेत व महिन्याच्या पूर्वार्धात रवि ग्रहही कौटुंबिक सुखाचे दृष्टीने प्रतिकुल होणार आहे. तसेच नेपच्यूनमुळे विविध कारणांनी दांपत्यजीवनातही अपेक्षित सुखसमाधान मिळेलच याची शाश्वती नाही. म्हणून मनावर संयम ठेवून, अहंकारी स्वभावाला अंकुश लावून नम्रतेचे आचरण करणेच सुखाचे होईल. त्यामुळे महिन्याच्या उत्तरार्धात बदलणाऱ्या परिस्थितीचा आनंद लुटता येईल. वकिली, सल्लागारी, हिशेब, चिकित्सक बौद्धिक व्यवसाय, शिक्षणक्षेत्र असे नोकरी-व्यवसाय असणारांना काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळीना महिन्याचा उत्तरार्धच अनुकुल व लाभदायक होईल. या राशीच्या युवकांना काही नवीन करावेसे वाटेल; पण सध्या त्यांनी आहे ती नोकरीच करावी. पळत्याच्या मागे जाण्याचा विचारही करू नये. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात जन्मकुंडलीत योग असतील तर गुरु-शुक्राच्या शुभ योगामुळे या राशीच्या मंडळीना विविध मार्गांनी आर्थिक लाभ होण्याची शक्यता आहे. या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीस काळ अनुकुल आहे. या राशीच्या अष्टम स्थानी असलेल्या हर्षलमुळे अपघात भय आहेच. सतत सावधानतेने आचरण करा. श्रद्धा असेल तर कुलस्वामिनी व श्रीगणेश उपासना अनुकुल होईल.

**(६) कन्या -** या राशीच्या मंडळीना या महिन्याचा काळ शारीरिक-मानसिक आरोग्याचे दृष्टीने



प्रतिकुल आहे. शनि ग्रहाच्या साडेसातीचा काळ असून सध्या शनि-रवि हे दोन्ही ग्रहही अनुकुल नाहीत. त्यामुळे सतत मनाविरुद्ध घटना घडून असहय मनस्ताप सहन करावा लागणे, कुटुंबात अनिष्ट घटना घडणे, अनपेक्षित आर्थिक संकटे येणे, कोर्टप्रकरणे उद्भवणे अशा प्रकारचा असहय मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. त्यामुळेच शारीरिक-मानसिक आरोग्य बिघडण्याची शक्यताही नाकारता येत नाही. रक्तदाब, हृदयविकार असणारांनी विशेष काळजी घेतली पाहिजे. उष्णता भडकून डोळ्याचे अनारोग्य होणे संभवते. हाती घेतलेल्या कार्यात अडथळे निर्माण होणे, फ़सवणूक होणे अशा प्रकारच्या घटनांनी असहय मनस्ताप सहन करावा लागेलसे दिसते. जपा. पण गुरु-शुक्राच्या अनुकुलतेने विरोधी परिस्थितीतही मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व मनाला दिलासा लाभेल. या राशीच्या ज्या मंडळीना अध्यात्मात रस आहे अशांना उपासनेद्वारे मानसिक शांती लाभू शकेल. श्रीगुरुदत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल. तसेच दररोज सायंकाळी हनुमानचालिसा स्तोत्राचे मनापासून पठण केल्यानेही मनाची शक्ती वाढेल. हर्षलमुळे जीवनसाथीचे विक्षिप्त आचरण, मतभेद, भांडणे यांमुळे वैवाहिक जीवनातील सुखातही बाधा निर्माण होणे संभवते. भागीदारीत व्यवसाय असेल तर त्यातही विविध कारणांनी बाधा येऊ शकेल. जपा. काही मंडळीना उगीचच काही आजार झाल्याची भावना होईल. काल्पनिक चिंताच अधिक त्रास देतील जपा.

**(७) तुळा -** या राशीच्या मंडळीना या महिन्याच्या काळात रवि-मंगळ-शनि हे तिन्ही दादा ग्रह सर्व प्रकारच्या आरोग्य दृष्ट्या अत्यंत प्रतिकुल आहेत. त्यामुळे उष्णताविकार व वातविकारांचा आरोग्यावर परिणाम होणार आहे. तसेच शनि ग्रहाच्या साडेसातीचा काळ असल्यामुळे सतत मनाविरुद्ध घटना घडून आधीच हळव्या झालेल्या मनाला असहय मनस्ताप सहन करावा लागेलसे दिसते. अशा परिस्थितीत या राशीच्या ज्या मंडळीना रक्तदाब, हृदयविकाराचा त्रास आहे त्यांनी मन व बुद्धी शांत ठेवून अकारण त्रास होणार नाही याची काळजी घ्यावी. या राशीच्या काही मंडळीना उष्णता भडकून डोळे, घसा, मान दुखणे अशापैकी आजारांना तोंड द्यावे लागेल. अनपेक्षित आर्थिक जबाबदाऱ्या पार पाडणे अशक्य असल्यामुळे काहींना गहरे नैराश्य येणे संभवते. काही मंडळीना खर्चाची तोंडमिळवणी करताना कष्ट-श्रम-दगदग सहन करावी लागेल. विविध कारणांनी कौटुंबिक सुखातही बाधा येणे शक्य दिसते. अशा विपरीत काळातही शुक्राच्या अनुकुलतेने मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व त्यामुळे दिलासा मिळेल. जन्मकुंडलीत योग असतील तर या राशीच्या काही भाग्यवंत मंडळीना अचानक वा वारसाहक्काने धनलाभ होणे संभवते. चिकित्सक शास्त्रीय संशोधन कार्यात कार्यरत असणारांना काळ अनुकुल होईल. अध्यात्मिक उन्नतीस काळ अनुकुल होईल. श्रद्धेने हनुमानाची उपासना करा व हनुमानचालिसा स्तोत्राचे पठण करा.

**(८) वृश्चिक -** या राशीच्या मंडळीना या महिन्याच्या काळात त्यांच्या अहंकारी, हेकट, तापट, हट्टी स्वभावामुळे व मानापमान फ़ार असल्यामुळे अकारण श्रम, दगदग सहन करावी लागणार आहे. नोकरदार मंडळीना नोकरीत अपमान सहन करावे लागण्याची शक्यताही दिसते. त्यामुळे शारीरिक उष्णता भडकून उष्णताविकार व वातविकारांशी मुकाबला करावा लागेल. पण शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळीना महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल व लाभदायक होईल. महिन्याचा उत्तरार्ध मात्र मनस्तापदायक असल्याचाच अनुभव येईल. अशा परिस्थितीत महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात

काही मनोनुकुल घटना घडतील व त्यामुळे खूप बरे वाटेल. कौटुंबिक घरगुती जीवनात मात्र



गैरसमज, घोटाळे अशापैकी कारणांनी थोडी बाधा येऊ शकेल. या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीस काळ अनुकुल होईल. विशेष करून शास्त्रीय संशोधनात्मक शिक्षण चालू असेल तर काळ खूपच अनुकुल होईल. दाम्पत्यजीवनातील सुखात दोघांपैकी एकाच्या अनारोग्यामुळे व अन्य विविध कारणांनी बाधा येणे संभवते. जपा. या राशीच्या विवाहेच्छू युवकयुवतीना विवाहयोग आहे. शनि ग्रहाच्या साडेसातीचा काळ असल्यामुळे सतत आचरण व आर्थिक व्यवहारही विचारपूर्वकच करावेत. कसल्याही प्रकारच्या मोहाला बळी पडू नये. श्रद्धा असेल तर श्रीगणेश उपासना व श्री हनुमान उपासना अनुकुल होईल,

**(९) धनु -** या राशीच्या मंडळीना या महिन्याच्या काळात मंगळ व हर्षल हे दोन ग्रहच मनस्ताप देणार आहेत. या काळात या राशीच्या मंडळीना आहे त्यात सुखसमाधान वाटणारच नाही. सतत तक्रारी असतील. कोणाशीही पटवून घ्यावेसे वाटणार नाही. राहत्या जागेत सुख लाभणार नाही. मंगळ पूर्णपणे अशुभ असल्यामुळे मन सतत अस्वस्थ राहील, अनावश्यक खर्च होईल, कसली तरी चिंता सतावत राहील, मानहानीच्या घटना घडतील. विशेष करून स्त्रीवर्गाकडून दिला जाणारा त्रास सहन करावा लागेल. काही जुनी दबलेली प्रकरणे असतील तर ती पुन्हा उकरली जाऊन त्यांचा असह्य त्रास सहन करावा लागेल. पण शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळीना या महिन्याचा काळ अनुकुल व लाभदायक होईल. गुरु-शुक्राच्या अनुकुलतेमुळे आरोग्य सुधारेल व मधून मधून मनोनुकुल घटना घडतील. विशेष करून शैक्षणिक व उच्च बौद्धिक कार्यक्षेत्रात कार्यरत असणारांना काळ अनुकुल, लाभदायक व प्रसिद्धीदायक असा सिद्ध होईल. केवळ महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात नोकरी-व्यवसायात थोडे अडथळे, अडचणी निर्माण होण्याची शक्यता आहे. मात्र अपेक्षित संततिसुख मिळण्याची शक्यता नाही. काहींना गुरुकृपा किंवा थोर व्यक्तींची कृपा प्राप्त होईल. काहीना कीर्ती प्राप्त होणे संभवते. मन भावनाशील असल्यामुळे अध्यात्मात रस असेल तर उपासनेद्वारे मन:शांती लाभेल. या राशीच्या काही मंडळीना जलप्रवासाचे तर काहीना परदेशगमनाचे योग येतील.

**(१०) मकर -** या राशीच्या मंडळीना या महिन्याचा पूर्वार्धच नोकरी-व्यवसायाच्या दृष्टीने प्रतिकुल असणार आहे. आर्थिक व्यवहार विचारपूर्वक व सावधानपणे केल्यास आर्थिक चिंता करावी लागणार नाही. उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधनात्मक कार्यक्षेत्र असणारांना काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. काही मंडळीना परदेशवारीची संधी मिळेल. या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीस काळ अनुकुल असला तरी काही विद्यार्थ्यांच्या शिक्षणात अडथळे, अडचणी निर्माण होतीलसे दिसते. शुक्राच्या अनुकुलतेमुळे विविध प्रकारचे लाभ होतील. काहीना भूमिलाभ, काहीना धनलाभ तर काहीना प्रतिष्ठा प्राप्त होईल. शासकीय, निम-शासकीय सेवेत असणारांना महिन्याच्या उत्तरार्धातच आपल्या इच्छाआकांक्षा पूर्ण करणे शक्य होईल. सामान्य नोकरदार मंडळीना कष्ट परिश्रम करूनच अपेक्षित अर्थप्राप्तीसाठी प्रयत्न करावा लागेल. पण जुगाराचा नाद असेल तर मात्र नुकसानच होईल. तसेच ज्यांना सहज वाममार्ग धन मिळणे शक्य आहे त्यांनी त्याप्रकारे वाममार्ग धन मिळविण्याचा प्रयत्न करू नये. होत्याचे नव्हते होण्यास वेळ लागणार नाही. या राशीच्या काही भाग्यवंत मंडळीना मौलिक वस्तूंचा लाभ होणे संभवते. काहीही कारणाने मित्रांशी वितुष्ट येण्याची शक्यता जाणवते. जपा.

**(११) कुंभ -** सध्या या राशीच्या मंडळींचे मन अतिशय हळवे झाले असण्याची शक्यता



जाणवते. तसेच मानसिक संवेदनाही शीघ्र असल्यामुळे मनाविरुद्ध थोडेही काही घडले तरी लगेच गहरे नैराश्य येत असावे. अशा परिस्थितीत चंचल विचारांचे प्राबल्य असल्यामुळे स्वभाव लहरी, अस्थिर झाला असेल तर अनपेक्षितपणे विचित्र आचरण घडत असले पाहिजे. असे घडत असेल तर जिभेला लगाम घालून संयम-सहनशीलतेचे आचरण कराल तरच सुखाचे होईल. गुरु ग्रहाच्या कृपेने गृहसौख्य लाभेल; पण नातेवाईक मंडळीकडून मनस्ताप होण्याची शक्यता दिसते. जपा. ज्यांना स्थावर खरेदी वा विक्री करावयाची असेल त्यांना काळ अनुकुल व लाभदायक होईल. या राशीच्या व्यापारी मंडळीना स्त्री-ग्राहकांकडूनच अधिक लाभ वा हानी होईल. रवि ग्रह पूर्णपणे प्रतिकुल असल्यामुळे घरीदारी, नोकरी-व्यवसायाच्या ठिकाणी मतभेद, भांडणे होण्याची दाट शक्यता आहे. जपा. या राशीच्या काही मंडळीना उष्णता भडकून ताप येणे, अपचन होणे, मूत्राशयविकार बळावणे, पोट दुखणे अशापैकी आजार होतीलसे दिसते. काहींना जीवनसाथीच्या अनारोग्याची व मुलांपैकी कोणाच्या अनारोग्याची काळजी घ्यावी लागेल. या राशीच्या नोकरदार मंडळीना कामाचा ताण सहन करावा लागेल, तर युवकांना नवीन काही करण्याची तीव्र इच्छा अस्वस्थ करील. स्वतंत्र व्यवसाय असणारांना अडचणींना सामोरे जावे लागेल. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात परिस्थिती थोडी सुधारेल **(१२) मीन -** या राशीच्या मंडळीना या महिन्याचा काळ प्रतिकुल आहे, असेच म्हणावे लागेल. एकूण सर्व ग्रहमान फ़ारसे अनुकुल नाहीच. सध्या या राशीच्या मंडळींचा स्वभाव अस्थिर, चंचल, लहरी असा झाला असावा. त्यांच्या आचरणावरून या गोष्टी स्पष्ट होत असतील. हे सर्व हर्षल ग्रहाच्या प्रभावामुळे घडत असते. असे असले तरी हा हर्षल उच्च बुद्धिदाता असल्यामुळे चिकित्सक शास्त्रीय संशोधन कार्यात यशदायक आहे. या राशीची लहान मुले सध्या अतिशय हूडपणा व व्रात्यपणा करत असतील, असे वाटते. या राशीच्या लेखक मंडळींचे लेखन ग्रंथरूपाने प्रकाशित होण्यास काळ अनुकुल आहे. पण भावंडापैकी कोणाकडून मनस्ताप दिला जाण्याची शक्यता दिसते. जपा. रवि-शनि हे दोन पितापुत्र ग्रह या राशीच्या मंडळींचे सर्व प्रकारचे आरोग्य बिघडवण्यास कारणीभूत होतील. रविमुळे शारीरिक अनारोग्य होईल तर शनिमुळे असह्य मनस्ताप देणाऱ्या घटना मनाचे आरोग्य बिघडवतील. राहूमुळे कौटुंबिक सुखात बाधा निर्माण होईल, तर मंगळामुळे प्रवासात त्रास होणे, मानहानी होणे अशापैकी घटना घडतील. जपा. या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीस काळ अनुकुल असला तरी स्वत:चे स्वाभाविक दोष नियंत्रित करून मनापासून अध्ययन करणे जमले पाहिजे. दांपत्यजीवनात दोघांपैकी कोणाचे अनारोग्य, दोघांतील मतभेद, भांडणे अशापैकी कारणांनी वैवाहिक सुखसमाधान मिळेलसे वाटत नाही.

=====ooooo=====